नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग
निशाणी क्र.४०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५**

मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नावः **शादुल्ला बेग हबीब बेग,**

वयः**७६ वर्षे,** व्यवसायः **शेती,**

राहणारः **सिरजखोड ता. धर्माबाद जि. नांदेड**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.डी.हाके यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

पोलीसांनी मला आरोपी आणि फिर्यादी यांच्या घरादरम्यान असलेल्या जागेवर पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. माझ्यासोबत सय्यद बाशीद हा देखील पंच हजर होता. पोलीसांनी माझ्यासमक्ष त्या जागेवरुन आरोपी क्र.१ कडुन एक लाकुड, दगड व फुकणी जप्त केली होती. त्याचा पंचनामा तयार करुन माझी सही घेतली. आता मला तो पंचनाम दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकुर पोलीसांनी वाचवुन दाखवला होता. त्यावर माझी सही आहे. **जप्ती पंचनाम्याला निशाणी क्र.४१** देण्यात येत आहे. आता साक्षीदाराला गुन्हयातील जप्त लाकडी काठी, लोखंडी पाईप व दगड निशाणी क्र.२५ ते २७ दाखवण्यात आले. ते तेच आहेत.

**आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एच.काझी यांच्या मार्फत साक्षीदाराचा शपथेवरील उलटतपास सुरू.**

**०२.** हे खरे आहे की, फिर्यादी माझा नातेवाईक आहे. हे खरे आहे की, माझे घर आरोपी अथवा फिर्यादीच्या घराला लागुन नाही. घटनेच्या दुस–या दिवशी पंचनाम्यासाठी बोलावले होते. घटनास्थळावर मातीचा ढिग, कचरा व लाकडे असल्याचे मी बघितले नाही. घटनास्थळावर वस्तु– निशाणी २५ ते २७ पडले होते, ते पोलीसांनी जप्त केले.

घटनास्थळाच्या पुर्वेस कच्चा रोड, पश्चिमेस सय्यद दादुची शेती, दक्षिणेस मिर्झा जावीद बेगचे घर व उत्तरेस सय्यद दादुचे घर आहे. हे खरे नाही की, असे काही काही घडले नाही की, वस्तु निशाणी २५ ते २७ हे आरोपी क्र.१ ते ३ यांच्याकडुन जप्त केले नाही. आरोपींनी त्यावस्तु त्यांच्या घरातुन आणुन दिल्या. पोलीसांनी मला पंचनामा वाचुन दाखवला होता. हे मी सांगु शकत नाही की, जप्ती पंचनाम्यात मोकळया जागेवरुन वस्तु जप्त केल्याचे लिहीलेले आहे, ते खरे आहे किंवा नाही.हे खरे नाही की, पोलीसांनी आरोपीच्या घरातुन वस्तु जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे. मला आरोपी आणि फिर्यादीच्या दरम्यान त्यांच्या घराच्या दरम्यानच्या मोकळया जागेबाबत भांडण आहे. हे खरे नाही की, मी फिर्यादीचा नातेवाईक असल्याने मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास–पुर्ण**

**फेरतपास–काही नाही.**

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/–

**(एस.ए.हरणे)**

**दिनांकः ३०.०७.२०२४** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.**